सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचलित

## श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालय, माटुंगा

मराठी विभाग प्रकाशित ई-नियतकालिक

# पालवी

## नव चैतन्य



वर्ष २, अंक २

मे २०२४

SEVA MANDAL EDUCATION SOCIETY'S

**SMT. MANIBEN M.P. SHAH WOMEN'S COLLEGE OF ARTS & COMMERCE (AUTONOMOUS)**

NAAC RE-ACCREDITED 'B++' GRADE WITH CGPA 2.88/4

UGC Honor : College with Potential for Excellence



## श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य महिला महाविद्यालय हे एसएनडीटी महिला विद्यापीठाशी संलग्न महाराष्ट्रातील पहिले महाविद्यालय

महाराष्ट्रातील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठाशी संलग्न म्हणून इ.स.१९५७ मध्ये केवळ ७ विद्यार्थिनीसह माटुंगा सेवा मंडळाचे महिला महाविद्यालय गुजराती माध्यमातून सुरू झाले. सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी ही शैक्षणिक संस्था (SMES) १९७१ मध्ये स्थापन झाली. त्यानंतर हे श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य महिला महाविद्यालय ह्या नावाने महाराष्ट्रातील पहिले महिला महाविद्यालय म्हणून ओळखले जाऊ लागले.

श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य महिला महाविद्यालयात १९८४ साली पदवी अभ्यासक्रमात कला विद्याशाखेत समाजशास्त्र, मानसशास्त्र हे विषय इंग्रजी माध्यमातून तर हिंदी विभाग आणि आंतरविद्याशाखेतील गृह-अर्थशास्त्र कला विद्याशाखा आणि वाणिज्य विद्याशाखा सुरू झाल्या. १९९१ साली मराठी माध्यमातून मराठी भाषा व समाजशास्त्र हे विषय शिकविण्यास सुरूवात झाली. १९९४ रोजी महिला विद्यापीठातील पहिला अभ्यासक्रम संगणक अनुप्रयोग, कार्यालय व्यवस्थापन, जाहिरात आणि विक्री प्रोत्साहन मध्ये यूजीसी (UGC) व्यावसायिक अभ्यासक्रम, २००२ साली एस.एन.डी.टी महिला विद्यापीठांतर्गत प्रथम व्यवस्थापन अध्ययनांमध्ये सेल्फ-फायनान्सिंग ग्रॅज्युएट प्रोग्रॅम आणि कमलाबेन गंभीरचंद शाह मॅनेजमेंट स्टडीज (BMS) विभाग सुरू झाले.

२००४ साली मानसशास्त्र (MA), वाणिज्य (M.com) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम केंद्र तर २०१० साली हिंदी (MA) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम केंद्र सुरू झाले. २००६ साली श्रीमती कमलाबेन गंभीरचंद शाह मास मीडिया (BAMM) पदवी अभ्यासक्रम सुरू करणारे हे पहिले महाविद्यालय आहे. २०१३ साली नॅक मूल्यांकन दुसऱ्या चक्रात महाविद्यालयास 3.61/4 (A Grade) प्राप्त झाली. २०१४ साली अकाउंट्स, फायनान्स आणि इन्शुरन्ससह बीकॉम - सेल्फ-फायनान्सिंग(BAFI) सुरू करण्यात आले. २०१७ साली इंग्रजी माध्यमातून अर्थशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरू झाला.

२०१९ साली श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य महिला महाविद्यालय हे प्रथम स्वायत्त महिला महाविद्यालय म्हणून जाहीर झाले. महिलांना दर्जेदार शिक्षणाद्वारे त्यांचे सक्षमीकरण करणे. स्वावलंबी,जबाबदार गृहिणी,व्यावसायिक आणि सक्षम नागरिक बनविणे ही दृष्टी बाळगूनच अभ्यासक्रमाची निवड करून १९५७ पासून जो अविरत शैक्षणिक प्रवास सुरू झाला तो आजतागायत. महिला शिक्षण क्षेत्रात सेवा मंडळ ऐज्युकेशन सोसायटी ही शैक्षणिक संस्था नेहमीच अग्रेसर राहिली आहे.

# संपादकीय

सेवा मंडळ सोसायटी संचलित श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालय हे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरशी महिला विद्यापीठाशी संलग्न असे पहिले महाविद्यालय आहे. आपल्या महाविद्यालयास UGC STATUS : College With Potential For Excellence हा दर्जा प्राप्त झाला असून. 'महर्षी कर्वे उत्कृष्ट महाविद्यालय २०१७-१८' ह्या पुरस्काराने महाविद्यालयास सन्मानित करण्यात आले आहे. 'शिक्षणाच्या माध्यमातून महिलांना सक्षम, आत्मनिर्भर आणि जबाबदार नागरिक बनविणे' हे महाविद्यालयाचे ब्रीद आहे. आपले महाविद्यालय ६६ वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहे.

आपल्या महाविदयालयाच्या मराठी विभागात पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जाते. मराठी विभागात वर्षभर विविध साहित्यिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास व्हावा याकरिता मराठी विभाग नेहमीच कटीबद्ध असतो. व्यक्तिमत्त्व विकासापासून ते स्त्री सक्षमीकरणा पर्यंतचा विद्यार्थिनीचा प्रवास सुकर व्हावा, ह्याकरिता शारदोत्सव व्याख्यानमाला, वेगवेगळ्या कार्यशाळांचे आयोजन, विद्यार्थिनींचा साहित्य संमेलनांत सहभाग, चर्चासत्र, शोधनिबंधांचे सादरीकरण ह्यासारख्या उपक्रमात मराठी विभागातील विद्यार्थिनी सतत सहभागी होत असतात. मराठी विभागाचा एक सर्जनशील उपक्रम म्हणजे 'पालवी' ई-नियतकालिक २०२२-२३ पासून प्रकाशित होत आहे.

'पालवी' ह्या नियतकालिकाचा २०२३-२४ हा दुसरा अंक आहे. सदर अंकात विद्यार्थिनीनी स्वरचित कविता, कथा, ललित लेख लिहण्याची संधी मराठी विभागाने दिल्याबद्दल, मी महाविद्यालयाच्यावतीने मराठी विभाग प्रमुख डॉ. रश्मी शेट्ये तुपे आणि प्रा. सुप्रिया शिंदे यांचे मन:पूर्वक अभिनंदन करते आणि पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा देते.



**डॉ. अर्चना पत्की**
**प्राचार्य**

# संपादकीय मंडळ

डॉ. अर्चना पत्की

डॉ. रश्मी शेटये तुपे

प्रा.सुप्रिया शिंदे

कु.तन्वी ठाकूर

कु.दुर्गा जोगदंड

कु. मुद्रा चव्हाण

कु.मनाली मणचेकर

कु.विशाखा भोसले

# अनुक्रमणिका


| अनु क्र. | विषय | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| १ | गावाकडच्या आठवणी - संघमित्रा पडवणकर | १ |
| २ | धीर कधी सोडू नको.... - दिक्षा कापुरे | ३ |
| ३ | मातृत्त्व – समृद्धी काकडे | ५ |
| ४ | वाचनाचे महत्त्व - अश्लेषा कांबळे | ६ |
| ५ | शेवटचे क्षण - मनाली मणचेकर | ८ |
| ६ | ठिपक्यांची रांगोळी – प्राजक्ता शेवाळे | १० |
| ७ | आरशातली स्त्री – रितुजा यादव | १२ |
| ८ | परीक्षा – नम्रता धुमाळे | १४ |
| ९ | लोकसंख्यावाढ आणि कुटुंबनियोजन – प्रतिभा सुर्वे | १५ |
| १० | वृक्षांचे मानवी जीवनातील स्थान – दुर्गा जोगदंड | १८ |
| ११ | मी मुलगी आहे म्हणून ! - तन्वी ठाकूर | २० |
| १२ | मराठी विभागातील उपक्रम | २१ |

# गावाकडच्या आठवणी....



डोंगरांची रांग होती, पाखरांचे गाणे होते,
त्या तिथे पलीकडे हो,दूर माझे गाव होते...

तो वडाचा पार होता,एक अन देऊळ होते,
त्या तिथेपलीकडे हो दूर माझे गाव होते....

आठवणी ह्या आपल्या आयुष्याचा एक महत्त्वाचा घटक आहे.आपल्या व्यक्तिमत्त्वाला या आठवणी आकार देतात कारण आपले सर्व ज्ञान आणि भूतकाळातील अनुभव या सर्व गोष्टी तिथे साठवल्या जातात. 'गाव'या शब्दाचा उल्लेख झाला की माझ्या आठवणींना पंख फुटतात. आठवते ती सुंदर आणि मनमोहक होणारी सकाळ, मनाला भावेल अशी शुद्ध हवा, चहुकडे दरवळीत असलेला मातीचा सुगंध, रम्य आकाशात उडणारे सुंदर पक्षी, त्यांचा गोड आवाज, देवळात होणारी आरती,शेतात जाणारे शेतकरी या सर्व गोष्टी माझ्या गावाला सुंदर बनवतात.

माझ्या बालपणीतील एक आठवण म्हणजे मी दहा वर्षांची असताना पहिल्यांदाच गावी गेले.माझं गाव एका सुंदर अशा डोंगरावर आणि चारही बाजूने वृक्षांनी वेढलेले आहे.माझ्या गावाचं नाव रत्नागिरीतील 'पडवण' हे आहे. ह्या गावाच्या नावावरूनच आमचे आडनाव पडवणकर असे पडले. माझ्या गावात पन्नास ते साठ कुटुंब राहतात. माझ्या गावात दहावीपर्यंतची शाळा आहे. गावच्या मध्यभागी एक देऊळ आहे. देवळात गाभाऱ्या समोर विस्तृत सभागृह आहे. या सभागृहात भजनाचे व मनोरंजनाचे कार्यक्रम सतत चालू असतात. माझ्या गावात पाण्याची कमतरता नाही कारण अनेक विहिरी आहेत.गावातील एका मोकळ्या मैदानात आम्ही नेहमी लंगडी, लगोरी,डोंगर का पाणी असे अनेक खेळ खेळत लहानाचे मोठे झालो आहोत. गावाच्या मध्यभागी कौलारू घर,आंब्याच्या बागा,काजूची लागवड, नारळीची झाड हे सगळं पहिल्यांदा बघितलं आणि मन हरवून गेलं. घरासमोर अंगण,अंगण शेणाने सारवलेलं, अंगणात तुळस,तुळशीच्याभोवती काढलेली रांगोळी आणि घर माणसांनी भरलेलं. घराच्या जवळच शेती,गुरांचा गोठा हे सर्व कायम हवहवसं वाटतं. सकाळची न्याहारी गरम भाकर आणि सुकी मासोळी ती ही चुलीवरची. ही खाण्यात वेगळीच मजा आहे.दुपारी जेवताना लहानापासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांची सगळे पंक्तीत बसून जेवतात. जंगलात जाऊन लाकडं जमा करायची.आजीला अंगण सारवायला मदत करायची, आजोबांसोबत शेतावर जायचं, संध्याकाळी फिरायला जायचं, झाडावर चढायचं,मासे पकडायचे, नदीवर पोहायचं परत रात्री एकत्र सगळेच्या सगळे पंक्तीत बसून जेवायचं. रात्री उशिरापर्यंत अंगणात बसून गप्पा मारायच्या.



सगळंच मनाला भावून जाणारे आहे.फणसाच्या पानाचा बैल बनवणे, विहीर बनविणे हा माझा आवडता छंद. पावसाळ्यात तर गावाचे रूपच बदलून जाते. पहिला पाऊस पडला की त्या मातीचा सुगंध मनात मनाला हरवून जातो.शेतकरी शेती करतात तर बायकाही त्यांना मदत करताना दिसतात.शेतात नांगरणारे बैल हे तर नयनरम्य दृश्यच आहे. मी जेव्हा पहिल्यांदा गावी गेले तेव्हा तिथे माझी कोणीच मैत्रीण नव्हती. मग हळूहळू माझ्या अनेक मैत्रिणी झाल्या. त्यांच्यासोबत खेळायला निसर्गरम्य वातावरणात फिरायला मज्जा येऊ लागली. आम्ही सगळी भावंडे ही एकत्र बसून अनेक खेळ खेळायचो.सकाळी लवकर उठल्यावर आजी सोबत देवपूजेसाठी फुले गोळा करणे हे माझे आवडते काम. गावाकडे गेल्यावर आपल्याला खूप काही शिकायला मिळते. गावचं घर,रम्य संध्याकाळ, घराकडे परतणारी गुर, पक्षी, घराचे अंगण, आजी,भावंड,माया,प्रेम,आपुलकी,रात्री झोपताना गोष्टी ऐकताना आजीच्या मांडीवर डोकं ठेवून झोपणे याच्यासारखे स्वर्गसुख नाही. सुट्टी संपली की गावाकडून शहरात येताना मनच रमायचे नाही. आजही जरी शहरात असलो तरी गावाकडच्या आठवणी कायम मनात घर करून आहेत.

**संघमित्रा पडवणकर**

**प्रथम वर्ष**

**मराठी विभाग**

# धीर कधी सोडू नको...

अनेकवर्ष लागली आपणास
माकडापासून मानव होण्यास
मौल्यवान आहे हे जीवन
याला असेच संपवू नका
या जन्मावर प्रेम करा...
या जगण्यावर प्रेम करा...



अवघ्या जगाचा पोशिंदा तू
बळीराजा तू शेतकरी
अन्नदाता तो आमचा
तू देशाची शान
संकटांना घाबरू नको
धीर कधी सोडू नको
मौल्यवान आहे हे जीवन
यालाअसेच संपवू नको



आदिशक्ती तू,नवदुर्गा तू,
अंगणात बागडणारी चिमुकली तू,
आई,बहीण,काकू,मामी
अनेक भूमिका पार पाडतेस तू ...
कुटुंबाच्या सुखासाठी स्वतःला विसरतेस तू
स्वतः वर येणाऱ्या संकटांना घाबरू नको
धीर कधी सोडू नको
मौल्यवान आहे हे जीवन
याला असेच संपवू नको

बाबा ,दादा ,वडील तू
तू घराचा आधार
कुटुंबाच्या सुखासाठी झटणारा तू
आर्थिक संकटांना घाबरू नको
धीर कधी सोडू नको
मौल्यवान आहे हे जीवन
याला असेच संपवू नको



आजच्या तरुण पिढीला येते लगेच टेन्शन
सोशल मीडियावर लाईक नाही
ब्रेकअप झाला म्हणून येतं लगेच डिप्रेशन
अभ्यासही यांच्यासाठी एक प्रकारचा ताण
तू देशाचे भविष्य आहेस हे विसरू नको
मोबाईल आणि गेमसाठी जीवन असे संपवू नको
मौल्यवान आहे हे जीवन
याला असेच संपवू नको

वृद्ध म्हणजे मायेचा सागर
वृद्ध आहेत प्रेमळ आणि गोड
तुमच्याकडेच असतात आयुष्यातील धडे खरे
स्वतःला कमी लेखू नका
आयुष्यात कित्येक संकटांचा सामना तुम्ही केला
मग आता धीर सोडू नका
मौल्यवान आहे हे जीवन
याला असेच संपवू नका
या जन्मावर प्रेम करा या जगण्यावर प्रेम करा...


**दिक्षा कापुरे**
तृतीय वर्ष
समाजशास्त्र विभाग

# मातृत्व

मातृत्व काय असतं ?
मायेचे पांघरूण, कोमल स्पर्श
सुरक्षिततेचे कवच
जोडलेली नाळ
अन् जीवापाड जपलेले प्रेम म्हणजेच मातृत्व.

तू म्हणजे आधार, तू म्हणजे छाया
ओंजळीत वात्सल्याची कधी कमी नाही केली माया
कुणासाठी तू मदर
तर कुणासाठी तू आम्मी
कुणासाठी तू आई
तर कुणासाठी तू मम्मी

रूप तुझे अनेक
त्या रूपात कर्तव्य तुझी अनेक
शेवटच्याश्वासापर्यंत तिला
आपलाच लळा असतो
आपलं व्हावं यातच तिचा सोहळा असतो.

तिचं पाखरू असत लहान
तिच्या पंखाखाली मन असतं निवांत
चिंता कधी वाटत नाही
आयुष्यातलं 'आई' नावाचं पान
काहीही झालं तरी कधीच मिटत नाही.




**समृध्दी काकडे**
बारावी
कला शाखा


# वाचनाचे महत्त्व

असा धरी छंद । जाई तुटोनिया भावबंध ।
छंद लागला टिटवीला । सप्तसागर शोषित केला ।।

माणूस आपल्या आवडत्या छंदात बुडाला की त्याला भोवतालच्या जगाची जाणीव ही राहत नाही. वाचन हा सुद्धा असाच एक छंद आहे. वाचनाचे महत्त्व सर्व स्तरातील व्यक्ती जाणतात. लहान मुलांना वाचनाचे महत्त्व शाळेपासूनच पटवून दिले जाते. शालेय जीवनात असताना वाचनाचे संस्कार होणे अत्यावश्यक असते. कुठलीही महान व्यक्ती वाचनामुळेच महान बनू शकते हे त्यांच्या आत्मचरित्राचा अभ्यास केल्यानंतरच समजते. ज्याला वाचनाची आवड आहे त्याला कुठेही कोणत्याही वेळी कंटाळा येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. कितीही लांबचा प्रवास असो. हातातील पुस्तक त्या प्रवासाचा कंटाळा आणून देत नाही. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, जयप्रकाश नारायण, विदा सावरकर अशा थोर व्यक्तींना आपल्या जीवनातील बराच काळ तुरुंगात काढावा लागला. तेथे वाचन या छंदाने त्यांना उत्तम साथ दिली.

आपले संस्कार आणि जडणघडण कशी आहे हे वाचनातूनच आपल्याला कळते. आयुष्यातील वेगवेगळ्या दिशांना स्पर्श करण्याचे सामर्थ्य वाचनातून प्राप्त होते. वाचनामुळे व्यक्तीला पर्यायाने कुटुंबाला, समाजाला एक नवीन विकासाची दृष्टी प्राप्त होते. आज मोबाईल, तंत्रज्ञान विकसित झाले आहे त्याद्वारे ग्रंथालय आपल्या हातातच आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. जगभरातील लेखक तुमच्या भेटीला सहज येतात. त्याचा उपयोग आपल्याला करून घेता आला पाहिजे. आपल्यातील सुप्त गुणांचा यानिमित्ताने विकास होतो. एकदा का शब्द तुमच्या साथीला आले की मानवी गुण आणि व्यक्तिमत्व प्रकाशित होते. वाचनामुळे आपल्या ज्ञानात भर पडते. आजूबाजूच्या जगातील माहिती होते. माणूस अशिक्षित राहिला तर त्याची सगळीकडून फसवणूक होते. वाचनामुळे आपण ज्ञान संपादन करतो, विचारशक्ती वाढते आणि आपल्याला चांगल्या गोष्टींची प्रेरणा मिळते. समाजातील सर्व स्तरातील लोकांशी वागण्याची कला वाचनामुळे अवगत होते.





पुस्तके कधी हसवतात
तर कधी रडवतात
प्रेरणादायी पुस्तके मनात उत्साह निर्माण करतात
खरे विश्व पुस्तकात सामावलेले असते
अनेकांचे आयुष्य पुस्तकातूनच घडते.

पुस्तके ही खरोखरच आपले चांगले मित्र आहेत. कारण आपण कंटाळलेले असताना, अस्वस्थ, उदास, एकटे असताना आपण त्यांची साथ घेऊ शकतो. आपल्याला पाहिजे तेव्हा परिस्थिती बदलतात. आपल्याला अनेक नवीन माहिती देतात आणि आयुष्य जगत असताना नेहमीच योग्य मार्ग दाखवतात. पुस्तके वाचणे हा वेळेचा सदुपयोग करण्याचा अत्यंत योग्य मार्ग आहे. आयुष्यातून तणाव मुक्त होण्यासाठी ती आपल्याला मदत करतात. म्हणूनच आपण वाचनाची सवय विकसित केली पाहिजे.

**अश्लेषा कांबळे**
प्रथम वर्ष
वाणिज्य विभाग

# शेवटचे क्षण

का गेला तुम्ही सोडून
एवढीच होती का साथ आपली
पुन्हा जगू शकतो का आपण ते दिवस
येतील का ते क्षण परत.....



आज ही त्यांची खूप आठवण येते. काही आठवणी रडवतात तर काही आठवणी हसवतात.वाटलं नव्हतं आम्हाला एवढ्या लवकर सोडून जातील. मला आजही तो दिवस आठवतो. बाबा आजारी होते आणि मला आईचा फोन आला आई म्हणाली, 'बाबांना आम्ही हॉस्पिटलमध्ये घेऊन आलोय'. मी विचारलं, ते बरे आहेत ना आई ? ती थोडा वेळ शांतच राहिली, काहीच बोलली नाही. मी परत विचारलं, 'सांग ना आई काय झालं ?' मग आई बोलली, जास्त काही नाही...तसे बरे आहेत...तुम्ही इथे या... हे बोलून आईने फोन ठेवला. आम्ही लगेच रात्री गावी जायला निघालो. घरी जाऊन बॅगा ठेवल्या व तसेच हॉस्पिटलमध्ये गेलो. जाऊन बघितलं तर बाबा व्हेंटिलेटर वर होते. त्यांना तसं बघून आईच्या आणि आमच्या तोंडातून एक ही शब्द ही बाहेर पडला नाही. आईच्या डोळ्यातून फक्त अश्रू वाहत होते. बाबा आमच्याकडे बघत होते, त्यांना बोलायलाही जमत नव्हतं. आम्ही त्यांच्या बाजूला जाऊन बसलो. त्यांनी आमचा हात आपल्या हातात घट्ट पकडला व रडत होते. त्यांना समजलं होतं की ते आता जास्त दिवस राहणार नाही. मी लहान वयात अनेक अनुभव घेतले आहे. आपल्या आयुष्यात ज्या व्यक्ती असतात त्या असेपर्यंत आपल्याला त्यांची किंमत नसते त्या सोडून गेल्या की हव्याहव्याशा वाटतात.

माझ्यासोबत ही असेच झाले, मी त्या गोष्टी अजूनही विसरू शकत नाही. रोज ते दिवस डोळ्यासमोर येतात. एका गोष्टीचे खूप वाईट वाटते जेव्हा त्यांना माझी गरज होती तेव्हा मी त्यांच्याबरोबर नव्हते. ही गोष्ट आजही मला खूप त्रास देते. माझे बाबा थोडे कठोर होते. त्यांना काही विचारलं तरी ते ओरडायचे. पण त्यांच्या त्या ओरडण्यामध्ये ही प्रेम लपलेलं होतं. जेवढे ते बाहेरून कठोर दिसत होते तेवढेच ते आतून खूप प्रेमळ होते. आज मला त्यांच्या कठोरपणात कठोर पणा नव्हे तर प्रेमच दिसते. मला रोज वाटायचे माझ्या बाबांना मी आवडत नाही, ते माझ्यावर प्रेम करत नाही पण आता मला समजू लागले आहे की, हा फक्त माझा गैरसमज होता. त्यांनी तसे कधीच  दाखवून दिले नाही की, ते माझ्यावर किती प्रेम करायचे. आज मला माझ्या चुका कळल्या पण त्या चुका सुधारण्यासाठी माझ्याजवळ माझे बाबा नाहीत. ती वेळ निघून गेली. ज्याबद्दल आता मी काहीच करू शकत नव्हते. जेव्हा आपल्या जवळची व्यक्ती सोडून जाते तेव्हा आपल्या चुका लक्षात येतात पण त्या चुका सुधारण्यासाठीची वेळ निघून गेलेली असते.

या सगळ्यावरून मला एक गोष्ट कळून चुकली की आपल्या चुका जेव्हाच्या तेव्हा सुधारल्या पाहिजेत नाहीतर माझ्यासारखं आयुष्याच्या एका टप्प्यावर पश्चाताप होऊन त्रासच होतो. आपण त्या गोष्टी विसरण्याचा प्रयत्न केला तरीही विसरू शकत नाही. दिवस उलटून जातात ही पण त्या आठवणी त्याचं काय करावं. आईला रोज सकाळी पाच वाजता फोन यायचा ऊठ मुलांसाठी डब्बा बनवं. आता तो फोन मात्र परत कधीच येणार नव्हता. जे दिवस निघून गेले ते दिवस आज मला हवेहवेसे वाटत होते. पुन्हा एकदा त्या दिवसांमध्ये मला जगायचे होते. बाबा एक वाक्य नेहमी बोलायचे 'गेले ते दिवस राहिल्या त्या आठवणी' या वाक्याचा अर्थ मला आज समजत होता. खरच गेले ते दिवस राहिल्या त्या फक्त त्यांच्या आठवणी.  या आठवणी आता आयुष्यभर माझ्यासोबत चालतील २०१८ मध्ये मी बाबांसोबत मुंबई फिरण्यासाठी आले होते. ट्रेनमधून प्रवास करताना ते सगळं दाखवत होते. दोन दिवसांपूर्वीच बांद्रा स्टेशनवर वडील व त्यांच्यासोबत एक लहान मुलगी मला दिसली. त्यांना बघून माझे डोळे पाणावले. कॉलेजमध्ये जातानाचा तो प्रवास त्याची आठवण देऊन जाते. आज त्याची साथ मला भासत होती. रोज एकटीने  प्रवास करताना  खूप काही शिकते आहे. खूप मोठी स्वप्न घेऊन मी या शहरात आली आहे. ती स्वप्न पूर्ण करण्याची व बाबांचं नाव खूप मोठं करण्याची जिद्द आहे. क्षण असतातच आठवणी येण्यासाठी त्या क्षणांमध्ये मनसोक्त जगता आले पाहिजे.

तो गोड हसरा चेहरा
दिसेल का पुन्हा मला पुन्हा एकदा
तो मायेचा हात फिरेल का डोक्यावरून
भेटालका मला पुन्हा एकदा...
तुम्हीभेटल का मला पुन्हा एकदा....?



**मनाली मणचेकर**
प्रथम वर्ष
मराठी विभाग


# ठिपक्यांची रांगोळी

ठिपके ठिपके जोडले की, त्यांची सुंदर, सुरेख, सुबक अशी नक्षी तयार होते. बोटांच्या चिमटयातून हळूवार कौशल्यानं एकेक ठिपका जोडत जाणारी ही ठिपक्यांची रांगोळी किती मनमोहक दिसते. अगदी आखीव, रेखीव, एकसंध. पण ह्या रांगोळीतल्या एखाद्या जरी ठिपक्याला जोडणारी रेषा पुसली गेली, हे ठिपक्यांचं सौंदर्य विस्कटलं गेलं तर मात्र संपूर्ण रांगोळीची शोभाच नाहीशी होते.

नात्यांचंही असंच तर असतं. नात्यातला प्रत्येक माणूस म्हणजे एक ठिपकाच तर असतो. नात्यातला एखादा ठिपका विस्कळीत झाला तर नात्यांची गुंफण विस्कळीत होते, अपूर्ण राहते. सुगरणीनं एक एक काडी वेचून मजबूत आणि आकर्षक घरटं वीणावं तसा माणसा-माणसांचा एक एक ठिपका जोडल्यावर नात्यांची एक सुंदर अशी वीण तयार होते. नात्यांचं रोपटं खूप कोमल असतं. त्याला विश्वास आणि परस्पर सामंजस्यासं खतपाणी घातल्यावर ते पारिजातकाच्या झाडाप्रमाणे बहरत जातं. नात्यांची एक एक वीट रचत मायेचं घरकुल बनतं. अशा प्रकारे ठिपक्यांनी, मायेनं जोडलेली नाती हे माझं मायेचं आपलंसं असं प्रेमाचं व हक्काचं घरकुल आहे. इथे प्रत्येक व्यक्ती म्हणजे नात्यातील एक हळवा पक्षी आहे. माणसांतील ही हळवी जाणीव आणि सकारात्मक ऊर्जा या ठिपक्यांना बांधून ठेवण्याचं काम सप्तरंग ल्यालेली ही ठिपक्यांची रांगोळी करत असते. एक एक ठिपका जोडून आनंदाचं हसतं, खेळतं गोकुळ तयार होतं. तेच गोकुळ विविध रंगांनी परंपरांनी, समृद्धतेनं सणांच्या निमित्त एकत्र जोडल्या जातं.

ठिपक्यांची ही रांगोळी पुसली जाऊ नये, विस्कटली जाऊ नये यासाठी नाती जबाबदारीनं जपली पाहिजेत. त्यांचं सौंदर्य टिकवलं पाहिजे. आयुष्य खूपच सुंदर आहे. ते प्रेमाच्या वर्षावानं आणखी सुंदर बनवता येतं. पण ते टिकवण्यासाठी, फुलवण्यासाठी विचारपूर्वक प्रयत्नांची जोड मात्र असायला हवी. आपल्या जीवनातील ही नातीच आपल्याला जगण्याचं बळ व आनंद देतात. प्रत्येक माणूस गुण-दोषांचा पुतळा असतो. त्याच्या आतल्या भल्या-बुऱ्या विचारांच्या, कल्पनांच्या नेमक्या कुठल्या बाजूकडे आपलं झुकतं माप असतं यावरून नात्यांचं आयुष्य ठरत असतं. माणसाच्या स्वभाव वृत्तींनुसार कुणाला सर्वांसोबत मिळून मिसळून रहायला आवडतं तर कुणाला अगदी एककल्ली जीवन व्यतीत करण्यात स्वारस्य असतं. पण जरा विचार करा..... नातीच जर शिल्लक राहिली नाहीत, तर मनुष्याची काय अवस्था होईल. एखाद्या निष्पर्ण झाडासारखं निस्तेज जगणं, जे मरणाहून भयंकर असेल तेच वाट्याला येईल. म्हणून नाती जपायला हवीत. नातं जपणं म्हणजे तरी नेमकं काय ? समोरच्या व्यक्तीची काळजी घेणं, त्याचं मन जपणं, त्याच्याशी असलेला ऋणानुबंध आजन्म दृढ ठेवणं, विश्वास, निष्ठा, प्रामाणिकपणा आणि समजूतदारपणा या चतु:सूत्रीचा अवलंब केल्यास जगात कुठलंच नातं कधीच तुटू शकत नाही. यालाच तर नातं जपणं म्हणतात.

नात्यातला एकेक धागा गुंफत गेलं की आपोआप नातेसंबंधांची एक भक्कम दोरी तयार होते. आपण बालपणी "एकीचे बळ" ही गोष्ट ऐकलेली असते. नात्यांमधला हाच एकसंधपणा जीवनातील कुठल्याही संकटावर मात करण्यास उपयोगी पडतो. ह्या परस्पर ऐक्यातून दु:खाचे महामेरू सहज पार करता येतात. आयुष्यातील अडचणींवर मात करत परस्परांच्या शिरावर आधाराचा गोवर्धन लीलया पेलून धरता येतो. खरंतर आपण कुणीही नात्यांशिवाय जगूच शकत नाहीत. त्यामुळे नात्यांची ही पकड अधिकाधिक घट्ट व्हावी असे मनापासून वाटत असेल तर आपण सर्व नात्यांना प्रेमानं आणि आपुलकीनं जवळ केलं पाहिजे. हे नातेरूपी महावस्त्र टिकविण्यासाठी आपापल्या बाजूने खारीचा वाटा उचलला पाहिजे. कुटुंब म्हटलं की भांड्याला भांडं लागणारच. आवाज होणारच. पण या आवाजाला अवास्तव महत्व न देता, आपला अहंकार बाजूला सारून परस्परांत सुसंवाद साधता आला पाहिजे. त्यासाठी आपण स्त्री किंवा पुरूष म्हणून नाही तर एक माणूस म्हणून परस्परांकडे पाहणं आवश्यक आहे. तरच नात्यांची ही वीण आयुष्याच्या संध्याकाळपर्यंत मजबूत ठेवता येईल. मला तर हे पटलंय. बघा तुम्हांला पटतंय का? पटत असेल तर करा सुरूवात जोडायला.... ठिपक्यांची रांगोळी.




**प्राजक्ता शेवाळे**
तृतीय वर्ष
मराठी विभाग

# आरशातली स्त्री


सहज अलगदपणे एक कुजवूज ऐकू आली. रडके डोळे पुसून मी म्हणाले, "कोण?" आजुबाजूला पाहिले तर कोणीचं दिसले नाही. पुन्हा कुजबूज ऐकू आली. आरशातील स्त्री मला सहज म्हणाली, "काय गं ! ऋतू अश्रू कुठे लपवत आहेस ?" आरशातील स्त्रीला बोलताना पाहून मला जरा आश्चर्य वाटले. माझ्या मनात एक प्रश्न निर्माण झाला. ही कोण असेल? तेवढ्यात ती म्हणाली, " मी कोण मी म्हणजे ती जिला तूने आपल्या मनात कोंडून ठेवले आहेस, जी एकेकाळी बिनधास्त, मनसोक्त आयुष्य जगत होती. आता अश्रू लपवते, असं का ?"मी म्हणाले, "मी आधी बिनधास्त, मनसोक्त जगणारी होते. पण आता असं नाही. कारण प्रत्येक व्यक्तीच्या भावना जपता-जपता माझ्या भावनांचा कोणी विचाराचं केला नाही. सर्वांचा आनंद शोधण्यासाठी मी स्वतःचा आनंद विसरले. परंतु शेवटी मी एकटी राहते."

ती म्हणाली,"अगं मी तुझ्यासोबत आहे ना." मी त्यावेळेस चिडलेले होते. मी रागात म्हणाले, "पहिल्यांदा सर्वजण तेच म्हणतात, मी तुझ्यासोबत आहे ना. मग काही वेळानंतर तिच माणसे तुम्हाला इतके दुखवतील की असं वाटले, जगावं की मरावं. ते नातं आई-मुलीचं असो, बाप-मुलाचं, नवरा-बायकाचं,प्रियकर-प्रियसीचे किंवा इतर कोणतेही नातं, शेवटी बोट स्त्रीच्या चरित्रावर उचलली जातात. आता तू सांग का बरं अस ?" "हे बघ ऋतू प्रत्येकाच्या आयुष्यात संकटे असतात. ती स्त्री असो अथवा पुरुष आणि राहिला प्रश्न स्वाभिमानाचा, आपला आपल्यावर विश्वास असेल ना की, मी काही चुकीचं केलं नाही, तर मग जग काही बोलू दे, काही सिद्ध करू दे, काहीच फरक पडत नाही." असे ती म्हणाली. मी रडत म्हणाले की, " जगातील कोणतीही व्यक्ती मला काही म्हणू दे. मला त्यागोष्टीचा फरक पडत नाही, परंतु मला माझ्या जवळची व्यक्ती काही खालून पाडून बोलेल, तर माझे मन आतून तुटून जाते. पूर्णपणे जगण्याची इच्छा संपून जाते."

"अगं वेडे तू ऋतू आहेस, ऋतू म्हणजे जो संकटाबरोबर आपले वारे बदलतो आणि सर्वांना सोबत घेऊन चालतो. ऋतू स्वतःच्या नावाचा अर्थ पाहिलास तरी खूप काही मिळवलसं, जी इतरांना आत्मविश्वास देते. जी निसर्गाशी सखोल प्रेम करते. जी इतरांच्या दुःखात साथ, त्याचबरोबर मदतीचा एक हात देते, जी निःस्वार्थपणे सर्वांना मदत करते. जी चुकीच्या गोष्टीला तोंड देते. तर नेहमी ऋतूप्रमाणेच जगलीय. कधी वर्षासारखी रडलीस, कधी वसंतसारखी बहरलीस, कधी शरद ऋतूसारखी झडलीस, तर कधी ग्रीष्मासारखी रागावलीस. जर कधी तुला मरणाचा विचार आला किंवा जगायचे नाही असं वाटलं, तर तू स्वतः ला निवांत वेळ दे." अशी तू ऋतू आहेस.

मी म्हणाले, "ज्यावेळेस असे विचार येतात, तर मला काहीच सूचत नाही. यावेळेस मी काय करू? काय नको करु ?"

ती म्हणाली, "त्यावेळेस डोळे बंद कर दीर्घ श्वास घे आणि स्वतःच्या मनाला विचार मी जे काही करणार आहे, ते योग्य की अयोग्य ? तर तुला तिथे योग्य उत्तर मिळेल." मी म्हणाले, "ओके, परंतु मला यातून कायम निघायचं असेल, तर काय करू ? ती म्हणाली, "स्वतःला दिवसातील एक तास दे. त्यात तुझी दैनंदिनी लिही किंवा स्वतः ला सांग, परंतू यात एक अट आहे. वाईट गोष्टी विसरुन जा आणि चांगली गोष्ट आत्मसात कर. हे करणे सहज शक्य नाही. परंतु दररोज करशील तर सवय होईल." मी म्हणाले," खूप खूप धन्यवाद गं, तू मला योग्य मार्ग दाखला म्हणून तुझे खूप खूप आभार." ती म्हणाली," अगं तू नाही गं. स्वतः ने स्वतः ला केलेला उपदेश आहे. वास्तवात व्यक्ती आपल्या भावना सतत लपवत असतो. परंतू अश्रू, राग, प्रेम हे योग्य असलेले बरे, म्हणून सांगते जगण्याचे दोन नियम. 'एक म्हणजे दुःखात मनसोक्त रडावं,सुखात मनसोक्त हसावं. तेवढ्यात आईने हाताने जोरदार हलवले आणि म्हणाली "वेडी आहेस का तू ? कधीपासून हाका मारते, आणि आरशासमोर काय करतेस स्वतःशीच बोलतेस." त्यावेळेस मला आरशातील स्त्री कोण होती, हे लक्षात आले.



**रितुजा यादव**
तृतीय वर्ष
मराठी विभाग

# परीक्षा



परीक्षा म्हणजे परीक्षा असते
सर्वांसाठी ती एक संधी असते.
मानली तर खास असते
नाही तर फक्त टाइमपास असते.
असली तर अभ्यासाची लाट असते.
नाही तर एकंदरीच सगळ्याची वाट असते.

मानेच्या भाणि डोळ्यांच्या कसरतींची
मजा ती आगळीच असते.
मैत्री जागृत होण्याची वेळ आली
असे वाटण्याची गोडी वेगळीच असते.
पण वेळावेळाने लक्षात येते
येथे कुणी नसतो कुणाचा वाली

अभ्यास केला नसेल तर
कशी भरेल मार्कांची झोळी....
मग गरीबीसारखे लाचार होऊन
एकेक मार्क वेचन फिरायचे
आणि निकालाचा कटोरा घेऊन
बापुडवाणे बसायचे.....

त्यापेक्षा आताच मनी करा निर्धार
निरनिराळ्या विषयांशी करून टाका करार
मग अनुभवता येईल तुम्हांला
अभ्यासातील थरार....
आणि आपसूक गळ्यात पडेल
यशश्रीचा हार....

**नम्रता धुमाळे**
तृतीय वर्ष
मराठी विभाग

# लोकसंख्या वाढ आणि कुटुंब नियोजन

कुटुंब पाहिजे इतके छोटे
की लोकसंख्येचा प्रश्न सुटे.

देशाच्या भवितव्याचा दूरगामी विचार केला तर आपल्या देशापुढे सध्या तीन प्रमुख समस्या आहेत. लोकसंख्या नियंत्रण, पर्यावरण रक्षणासह आर्थिक विकास आणि दारिद्र्य निवारण. लोकसंख्येतील भरमसाठ वाढ-स्फोट आणि त्यामुळे येऊ घातलेले संकट याबद्दल आपण नेहमी ऐकतो. लोकसंख्या वाढ का होते? आपल्या देशापुरते सांगायचे तर आपली लोकसंख्या या शतकाआधीपर्यंत हजारो वर्षे अगदी हळू वाढत होती. स्थिर लोकसंख्या म्हणजे साधारणपणे जेवढे जन्म तेवढे मृत्यू होत राहणे. पूर्वी मृत्युदर जास्त असे आणि जन्मदरही जास्त असे.

जन्मदर फारसा न घटता केवळ मृत्युदर घटत राहिला तर काय होईल ? उत्तर असे की, लोकसंख्येमध्ये भर पडत राहिल. या विसाव्या शतकात वैद्यकीय शोध आणि आर्थिक विकास या दोन कारणांमुळे मृत्यूदर कमी होत गेला. मात्र जन्मदर त्या मानाने न घटल्यामुळे लोकसंख्या सतत वाढत गेली. लोकसंख्या वाढीचे आणखी एक कारण म्हणजे बाहेरुन येणाऱ्या लोकांची भर. शहरांची लोकसंख्या वाढण्याचे प्रमुख कारण ग्रामीण भागातून स्थलांतर करणारी कुटुंबे, मुंबईची अफाट लोकसंख्या ही देशाच्या ग्रामीण भागातून येणाऱ्या कुटुंबांनी वाढलेली आहे.

लोकसंख्या वाढीचा परिणाम काय होतो हे पाहू या. जगातील 'एकूण साधनसंपत्ती व अन्नउत्पादन भागिले एकूण लोकसंख्या'असे गणित केले तर काय उत्तर येईल ? यानुसार दरवर्षी क्रमाक्रमाने दरडोई साधनसंपत्ती व अन्न मिळणे कमीकमी होत जाईल. कारण साधनसंपत्ती व उत्पादन त्या प्रमाणात वाढणार नाही म्हणून आपली गरिबी कायम आहे, असे विधान सरकार आणि विचारवंतही करीत असतात. परंतु हे मात्र पूर्ण सत्य नाही. कारण एकूण उत्पादन भागिले एकूण लोकसंख्या हे गणित वास्तवात कधीच येत नसते. विषमता इतकी आहे की, एका बाजूला भरपूर खाण्याने तयार होणारे आजार वाढत आहेत तर दुसऱ्या बाजूला कुपोषणाचे साम्राज्य आहे. देशादेशांत, खेडया-खेडयांत, शहरा-शहरांत, वस्ती-वस्तीत फारच विषमता आहे. संपूर्ण पृथ्वीवरची परिस्थिती पाहिल्यास प्रगत देश (युरोप, अमेरिका, जपान) जगातील बहुतांश साधनसंपत्ती वापरतात. याउलट गरीब देश काटकसरीने आणि हलाखीचे जीवन जगतात असे दिसते महणून  केवळ कुटुंबनियोजन म्हणून हे गरिबीचे पूर्ण उत्तर नाही. गरिबीवरचे खरे उत्तर सर्वांचा आणि विशेषत: गरिब वर्गाचा विकास होणे हे आहे. असे झाले तरच कुटुंबनियोजन समाजातील सर्व स्थरांमध्ये स्वीकारले जाईल.

भारतातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा विचार केल्यास भारतीय जनजीवन स्वयंपूर्ण होणे शक्य कोटीतले आहे. पण त्यासाठी उपल जमीन-पाणी-निसर्ग यांची नीट निगा राखली गेली पाहिजे. तसेच शेती अर्थव्यवस्था टिकली पाहिजे. लोकसंख्या नियंत्रणाबद्दल खूप प्रचार केला गेला आहे. पण या नैसर्गिक साधनांच्या विनाशाबद्दल फारच थोडया  लोकांना जाणीव आहे. लोकसंख्या वाढीचा बोजा पृथ्वी मातेवर पडतोय हे खरेच आहे.

लोकसंख्या वाढ असो नसो, तरीपण कुटुंबनियोजन सर्वांनीच केले पाहिजे. कारण कुटुंबात एकटया स्त्रीवर मातृत्वाचा व देखभालीचा ताण पडतो. तसेच जास्त बाळंतपणे म्हणजे स्त्रीवर जास्त शारीरिक, मानसिक ताण, जास्त आजार. पाळणा लांबवणे, थांबवणे दोन्हीही स्त्रिया व मुलांच्या दृष्टीने सुखाचे आहे. म्हणूनच कुटुंबनियोजन महत्त्वाचे आहे. कुटुंबनियोजनाचा इतका प्रसार-प्रचार होऊनही त्यामानाने यश का मिळत नाही ? या प्रश्नाचे उत्तर पुन्हा गरीबीत शोधावे लागते. कुटुंब लहान ठेवायचे तर त्यासाठी योग्य सामाजिक, आर्थिक परिस्थिती असावी लागते.

शेतकरी कुटुंबात श्रम हेच जगण्याचे साधन असल्याने केवळ एका संतती वर थांबण्याची तयारी नसते. जोपर्यंत दोन वेळच्या जेवणासाठी लहानथोरांना राबायला लागते. तोपर्यंत 'दोन मुझे पुरेत 'एवढे म्हणून चालत नाही. जोपर्यंत जन्मणाऱ्यांपैकी ६-८ टक्के मुले एक वर्षाच्या आत मरतात. तोपर्यंत जास्त मुले होऊ देणे ही एक गरीब कुटुंबाला गरज वाटू लागते. सामाजिक विकास व वैद्यकीय मदत उपलब्ध झाल्यावर बालमृत्यू आणखी घटतील, तेव्हा अशा प्रकारची गरज वाटणार नाही. पुरुषप्रधान व्यवस्थेत वारसाहक्क मुलाकडे जातो. यामुळे आहे ती साधनसंपत्ती दुसऱ्या घरी जाऊ न देता आपल्याच घरात राहावी म्हणून मुलगा होणे आवश्यक मानतात. या दोन-तीन कारणांमुळे कुटुंबाचा आकार कमी होत नाही असे दिसते.



कुटुंबनियोजन आणि लोकसंख्या नियंत्रण या दोन्ही गोष्टी आपण वेगळ्या करून विचार करायला पाहिजे. कुटुंबनियोजन या कल्पनेचा कार्यकारणभाव वेगळा आहे. लोकसंख्या नियंत्रण हाही थोडा वेगळाच विषय आहे. पाळणा थांबवणे, लांबवणे वैगरे गोष्टी व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्रियांचे आरोग्य, मुलांचे संगोपन, कुटुंबाची अर्थव्यवस्था वगैरे गोष्टींना धरून असते. या सर्व गोष्टी झाल्याने आपोआप लोकसंख्या नियंत्रण होईल. याउलट केवळ लोकसंख्या नियंत्रण करायचे म्हणून कुटुंबनियोजन होत नसते. हा धडा भारत आणि चीन या दोन्ही देशात मिळाला आहे.

छोटया कुटुंबाची आहे शान
सदैव उंचावेल जीवनमान
सुखी संसाराचे सूत्र
कन्येलाच माना पुत्र
कुटुंब पाहिजे इतके छोटे
की लोकसंख्येचा प्रश्न सुटे
मुलापेक्षा मुलगी बरी
प्रकाश देते दोन्ही घरी

प्रतिभा सुर्वे
द्वितीय वर्ष
समाजशास्त्र विभाग



# वृक्षांचे मानवी जीवनातील स्थान

‘वृक्षवल्ली आम्ही सोयरे वनचरे’ हे संसारात राहून ही विरक्त जीवन जगणाऱ्या तुकाराम महाराजांचे बोल आहेत. आपल्यासारख्या चालत्या-बोलत्या माणसांपेक्षा गावाबाहेरच्या जंगलातील उपवनातील वृक्ष-वेली त्यांना आपल्याशा वाटतात. मानवी जगातील क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर अशा विकारांपासून दूर असणारी ही वृक्ष - वेली तुकारामांना जास्त आवडतात. कारण त्यांच्या सहवासातच या महान भक्ताला आपल्या मनाशी संवाद साधता येतो.

मानव आणि वनस्पति सृष्टी ही एकाच विधात्याची लेकरे, पण आज माणूस निसर्गापासून दूर गेला आहे. स्वतःने साधलेल्या प्रगतीमुळे त्याच्यातील अंहकार वाढला आहे. मला काहीही अशक्य नाही, असे तो मानतो. आपला भूतकाळ तो विसरून गेला आहे. याच निसर्गाच्या कुशीत आपण वाढलो हे तो विसरला आहे. याच वृक्षवल्लींच्या सान्निध्यात नित्य विहार करणाऱ्या आपल्या ऋषिमुनींनी ‘वेद’ रचले. भारतीय संस्कृतीची भक्कम बैठक आम्हाला दिली, हे सारे सोयीस्करपणे आपण विसरलो आहोत.

प्रगलीचा कैफ चढलेल्या माणसांनी परमेश्वरनिर्मित निसगविर घाला घातला आहे. विवेक हरवून बसलेल्या आजच्या माणसात चंगळवादाला उधाण आले आहे. मोठमोठया इमारती उभारण्यासाठी दाट अरण्य उद्धवस्त केली जात आहेत. अन्न शिजवण्यासाठी, शेकोटी पेटवण्यासाठी, घरे सजवण्यासाठी चंदनाची चोरी होतच आहे.

हे सारे पाहिले की वाटते, हा माणूस किती अविचारी आहे ! निसर्ग जणू माणसाला सांगतो की, अरे हे वृक्ष वर्षानुवर्ष जंगलात उभे आहेत ते तुमच्यासाठीच ना ! म्हणून तर तुमच्या पूर्वजांनी त्यांची बरोबरी संतपुरुषांबरोबर केली आहे. वृक्ष बाहु पसरून आपल्यासाठी पावसाची प्रार्थना करतात. आपल्या मुळांनी पायाखाली जमीन घट्ट पकडून ठेवतात. जमिनीची धूप थांबवतात. वातावरणातील प्रदूषण टाकण्यासाठी प्रयत्न करतात. आपल्याला वर्षानुवर्षे अनेक अमूल्य औषधे देतात. निसर्गात कचरा ही वस्तू निर्माणच होत नाही. निसर्गातील कचरा हा पुन्हा निसर्गात विलीन होऊन त्याचे खतात रुपांतर होत असते. हे मानवाला माहित असूनही आपण त्याची हानी करीत आहोत.

हे वृक्ष, या वेली अनेक मौलिक गोष्टी आपल्याला देतान. उदात्तता, भव्यता आणि निर्मलता ही तर त्यांची ठेवच आहे. पण 'सर्वांशी समान वागणूक' हा त्यांच्या जीवनातून मिळणारा संदेश आहे. माणूस आपल्या मुलाबाळांशी जसा वागतो, तसाच तो झाडांशीही वागला पाहिजे. हा संदेश जाणून सामाजिक वनीकरणाचे व्रत सर्वांनी स्वीकारले पाहिजे.


दुर्गा जोगदंड
द्वितीय वर्ष
मराठी विभाग




# मी मुलगी आहे म्हणून !

मी मुलगी आहे म्हणून काय झालं ?
मी वादळाशी झुंजवार आहे.
इवल्याशा पायात माझ्या.
मी आभाळ पेलवार आहे, मी मुलगी आहे.
मी मुलगी आहे म्हणून काय झालं ?
मी विजेसारखी चमकणार आहे.
२१ व्या युगाची शान मी होणार आहे, मी मुलगी आहे.
मी मुलगी आहे म्हणून काय झालं ?
मी सावित्रीचा वसा चालवणार आहे.
शिक्षणाचा झेंडा हाती घेऊन
प्रगतीचे दार उघडणार आहे, मी मुलगी आहे.
मी मुलगी आहे म्हणून काय झालं?
मी ही दोन घरांचा उद्धार करणारं आहे.
मुलगी असल्याचा अभिमानानं असणाऱ्या
आई-वडिलांचा आधार होणार आहे, मी मुलगी आहे.
मी मुलगी आहे म्हणून काय झालं ?
मी उंच भरारी घेणार आहे
वीर कल्पना चावला सारखी
मी ही अमर होणार आहे, मी मुलगी आहे.
मी मुलगी आहे म्हणून काय झालं ?
मी ही माणूस म्हणूनचं जगणार आहे.
पण.....सर्वांना माया, प्रेम देणारी
मी का नकोशी आहे ? का ? कारण मी मुलगी आहे.



तन्वी ठाकूर
द्वितीय वर्ष
मराठी विभाग

# मराठी विभागातील उपक्रम २०२३-२४

## गुरूपौर्णिमा

गुरूविण न मिळे ज्ञान, ज्ञानाविण नसे जगी सन्मान.







## भेट वारकरी संप्रदायाची





# जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन

## या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे



# देहदान





# ना. धो महानोर यांना काव्यमय श्रद्धांजली

ह्या शेताने लळा लाविला असा, असा की सुख दुःखाला परस्परांशी हसलो-रडलो.
आता तर हा जीवच अवघा असा जखडला मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जोहलो.......





# समग्र अत्रे






# मराठी सणसोहळे




श्रावणसोहळा

तिळगुळ समारंभ







नववर्ष शोभायात्रा

# मंगळागौर कार्यक्रम











## आपल्याकडे ज्ञानाचा खजिना असेल तर आपण आयुष्यातील प्रत्येक समस्येवर यशस्वीपणे मात करू शकतो. - भारत गौरव पुरस्कार प्राप्त सौ. राजश्री बोहरा.



वसई दि. १८ (प्रतिनिधी) : दिवसाजी काही तरी वाचत रहावे. वाचन ही एकमेव गोष्ट आहे जी तुमचे व्यक्तिमत्व घडविण्यात असते. वाचनाने ज्ञान वृद्धिंगत होते, आपल्याकडे ज्ञानाचा खजिना असेल तर आपण आयुष्यातील प्रत्येक समस्येवर यशस्वीपणे मात करू शकतो असे प्रतिपादन शिक्षिका, साहित्यिका, कवयित्री व भारत गौरव पुरस्कार प्राप्त सौ.राजश्री बोहरा यांनी सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती. माणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालयातील मराठी विभाग, जी.ओ. शाह ग्रंथालय आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'शारदोत्सव व्याख्यानमाला २०२३ अंतर्गत 'नवदुर्गा : नवविचार व 'वाचन प्रेरणा दिन' याचे औचित्य साधून आयोजित केलेल्या 'स्त्री वाचते तेव्हा' ह्या पहिल्या व्याख्याना प्रसंगी केले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. अर्चना यांनी कार्यक्रमात उपस्थितांचे स्वागत करीत स्त्रीशक्तीला वंदन करून, वाचन प्रेरणा दिनाच्या शुभेच्छा दिल्या. एक चांगले पुस्तक शंभर मित्रांप्रमाणे असतो त्यामुळे प्रत्येक विद्यार्थिनींनी आपल्या जीवनात अनेक साहित्य, पुस्तके ह्यांचे वाचन करीत रहावे हे भारतरत्न माजी राष्ट्रपती मिसाईलमॅन डॉ. ए पी जे अब्दुल कलाम ह्यांचे विचार विद्यार्थिनी पुढे मांडले. आजची पहिली माळ ही मातृदेवतेची आहे त्यामुळे आपल्या मातृभाषेबद्दल आदर बाळगला पाहिजे आणि मराठीतील दर्जेदार साहित्य वाचत राहिले पाहिजे.

सदर कार्यक्रम आभासी पद्धतीने पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. रश्मी शेटये- तुपे यांनी केले. ईशस्तवन व विद्यापीठ कुलगीत माजी विद्यार्थिनी कु. माधवी पवार हिने सादर केले. प्रमुख मार्गदर्शकांची ओळख प्रा. सुप्रिया शिंदे-टाकळे यांनी केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील मान्यवर प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी, ग्रंथपाल, शिक्षकेतर कर्मचारी,पालक आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी सर्वांत प्रथम स्वतःमध्ये आत्मविश्वास निर्माण करा -प्रियंका कुटे



वसई दि. १९ (प्रतिनिधी) : सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित ...


## ज्ञान आणि कौशल्य यांच्या बळावर प्रसार माध्यमातील स्त्रियांचा सहभाग निश्चित वाढू शकतो.- दक्षता ठसळे- घोसाळकर



वसई दि. २० (प्रतिनिधी) : सध्याचे युग हे प्रसारमाध्यमांचे युग आहे. ...

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२३-२४

## माय मराठी संतवाणी, ओवी, अभंग, कीर्तन, गाणी
## माय मराठी अमृतवाणी, साहित्यिकांच्या लेखनीत, शब्दमाधुर्य गुंजती















# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२३-२४













# जोतिबा फुले पुण्यतिथी आणि बाबासाहेब आंबेडकर जयंती







# सावित्रीबाई फुले यांची जयंती





# अतिथी व्याख्यान




मराठी विभाग आयोजित
व्याख्यान
ललित गद्य
व्याख्याते
प्रा. निर्मला
(आनंदिता)


मराठी विभाग आयोजित
व्याख्यान : मराठी वाङ्मयाचा
GPS Map Camera
Mumbai, Maharashtra, India
Smt. Parmeshwari Devi Gordhandas Garodia Educational Complex, 338, Rafi Ahmed Kidwai Rd, Matunga East, Mumbai, Maharashtra 400019, India
Lat 19.02861°
Long 72.859733°
09/10/23 10:59 AM GMT +05:30
Google


मराठी विभाग आयोजित
व्याख्यान



# विद्यार्थिनींचा साहित्यिक सहभाग







# मराठी भाषा गौरव दिन २०२३-२४

## मुंबई चौफेर

### विद्यार्थ्यांना असामान्य कर्तृत्व दाखवायचे असेल, तर स्पर्धा परीक्षा ही एक सुवर्ण संधी – संतोष पवार

मुंबई – योग्य वयात स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाची तयारी केलीत, तर यश तुम्हाला मिळणारच. स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासासाठी विद्यार्थी मानसिकरित्या तयार असणे आवश्यक असते. परीक्षांच्या माध्यमातून वेळेचे नियोजन करणे, उत्तर देण्याची पद्धत व विचारांची अचूकता, विचारांची क्षमता वाढविणे, परीक्षेला सामोरे जाण्याचा आत्मविश्वास वाढविणे, चाकोरी बाहेरचा विचार करणे आणि हे सारे करीत असताना, यश-अपयश पचवण्याची ताकद विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणे गरजेचे आहे, म्हणूनच विद्यार्थ्यांना असामान्य कर्तृत्व दाखवायचे असेल, तर स्पर्धा परीक्षा ही एक सुवर्ण संधी आहे, असे मत ओंकार करिअर अकॅडमीचे संचालक संतोष पवार यांनी व्यक्त केले.

सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित माणिबेन एम. पी. शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयात मराठी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या प्रशासकीय सेवा आणि मराठी भाषा या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना, ओंकार करिअर अकॅडमीचे संचालक संतोष पवार बोलत होते. स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करताना शालेय स्तरावरचा अभ्यास महत्त्वाचा आहे. स्पर्धा परीक्षेबद्दलची भीती व गैरसमज काढून टाका व प्रयत्न करा, यश तुमचेच आहे, असेही मत संतोष पवार यांनी मार्गदर्शनपर व्याख्यानात केले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. अर्चना पत्की यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. ध्यास मराठी श्वास मराठी, या गीताने प्रथम वर्ष कला शाखेतील विद्यार्थिनी मनाली मणचेकर हिने कार्यक्रमाची सुरुवात करून संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कलाशाखा प्रमुख प्रा. रेणुका प्रजापती यांनी महाविद्यालयाच्या वतीने प्रमुख पाहुणे संतोष पवार आणि सर्व उपस्थितांचे स्वागत करून सगळ्यांना शुभेच्छा दिल्या.



### स्पर्धापरीक्षा ही एक सुवर्ण संधी आहे – संतोष पवार

मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : "योग्य वयात स्पर्धापरीक्षेच्या अभ्यासाची तयारी केलीत तर यश तुम्हांला मिळणारच. स्पर्धापरीक्षांच्या अभ्यासासाठी विद्यार्थी मानसिकरीत्या तयार असणे आवश्यक असते. परीक्षांच्या माध्यमातून वेळेचे नियोजन करणे, उत्तर देण्याची पद्धत आणि विचारांची अचूकता, विचारांची क्षमता वाढविणे, परीक्षेला सामोरे जाण्याचा आत्मविश्वास वाढविणे, चाकोरी बाहेरचा विचार करणे आणि हे सारे करत असताना यश-अपयश पचवण्याची ताकत निर्माण करणे. विद्यार्थ्यांना असामान्य कर्तृत्व दाखवायचं असेल तर स्पर्धापरीक्षा ही एक सुवर्ण संधी आहे," असे मत सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती. माणिबेन एम. पी. शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयातील 'मराठी भाषा गौरव दिना'चे औचित्य साधून मराठी विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'प्रशासकीय सेवा आणि मराठी भाषा' या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना 'ओंकार करिअर अकॅडमी'चे संचालक संतोष पवार यांनी उद्गारले. स्पर्धापरीक्षेसाठी तयारी करताना शालेय स्तरावरचा अभ्यास महत्त्वाचा आहे. स्पर्धापरीक्षेबद्दलची भीती आणि गैरसमज काढून टाका, प्रयत्न करा यश तुमचेच आहे असे ही आवाहन मार्गदर्शनपर व्याख्यानात पवार यांनी केले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. अर्चना पत्की यांनी 'मराठी भाषा गौरव दिना'च्या शुभेच्छा दिल्या.

# संस्कृत संभाषण वर्ग २०२३-२४

सरल भाषा संस्कृतं सरस भाषा संस्कृतम् ।
सरस सरल मनोज्ञमङ्गल देवभाषा संस्कृतम् ॥
मधुरभाषा संस्कृतं मृदुलभाषा संस्कृतम् ।
मधुर मृदुल मनोहरामृत तुल्यभाषा संस्कृतम् ॥












# मराठी विभागातील विद्यार्थिनींचा गौरवांकित प्रवास



















मराठी विभाग प्रकाशित ई-नियतकालिक

# पालवी

## नव चैतन्य




SEVA MANDAL EDUCATION SOCIETY'S
SMT. MANIBEN M.P. SHAH WOMEN'S COLLEGE OF ARTS & COMMERCE (AUTONOMOUS)
NAAC RE-ACCREDITED 'B++' GRADE WITH CGPA 2.88/4
UGC Honor : College with Potential for Excellence

मराठी विभाग, श्रीमती. परमेश्वरी देवी गोरधनदास गरोडिया शैक्षणिक संकुल,
३३८, आर ए किडवाई रोड, माटुंगा (पू), मुंबई ४०००१९

द्वारे प्रकाशित, सर्व कॉपीराइटसह @२०२४